PUNE METROPOLIS

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
Pune Metropolitan Region Development Authority, Pune
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४.
दूरध्वनी क्र.०२०-२७१६६०००, Email : dyceoland@gmail.com

क्र. जमिन व मालमत्ता विभाग/प्राधिकरण/ २८० दिनांक : 29 JAN 2025

## परिपत्रक

विषय – पेठ क्र. ५ व ८, पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंशन सेंटर, मोशी (PIECC) येथील मोकळी जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्त्वावर देणेकामी Standard Operating System (SOP) निश्चित करणेबाबत.

पेठ क्र. ५ व ८, पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंशन सेंटर, मोशी (PIECC) येथील जागा विविध संस्थांच्या मागणीनुसार प्रदर्शनाचे आयोजन करणेकरीता तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन देण्यात येते. त्याकरीता खालीलप्रमाणे Standard Operating System (SOP) / कार्यप्रणाली निश्चित करणेत येत आहे.

१) तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण सभा क्र. ३३५ मधील ठरावानुसार दि. ०१/०१/२०१९ पासून दरवर्षी १०% दरवाढ करुन सन २०२४ करीता खालील दराप्रमाणे भाडेआकारणी करणेत येईल.

| अ. क्र. | प्रयोजन | प्रत्यक्ष प्रदर्शनाचा कालावधी साठीचा दर प्रती दिन / प्रती चौ.मी. रु. | पूर्व तयारी व जागा पूर्ववत करण्यासाठीच्या कालावधीसाठी आणि वाहनतळासाठी येणारा दर प्रती दिन / प्रती चौ.मी. रु. |
|---|---|---|---|
| | | प्राधिकरणाने प्रस्तावित केलेला दर | |
| १. | प्रदर्शन | | |
| अ) | वाणिज्यिक / औद्योगिक | १९.४८/- | ९.७४/- |
| ब) | सेवाभावी संस्था | ९.७४/- | ४.८७/- |
| क) | शासकीय / निमशासकीय संस्था व महामंडळे | ४.८७/- | २.४४/- |
| २. | सर्कस, प्रासंगिक सोहळे व इतर प्रयोजने | ४.८७/- | २.४४/- |
| ३. | धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम | ४.८७/- | २.४४/- |

२) प्रदर्शनकर्त्यांनी ज्या तारखेपासून जागा मागणी केली असेल त्यापासून १८ महिने अगोदर जागेचे Advance Booking देण्यात येईल. त्यासाठी प्रदर्शनकर्त्यांकडून एकूण भाडेरकमेच्या २०% Non-refundable Advance Booking Amount आकारणी करणेत येईल.

३) ज्या तारखेपासून जागा मागणी केली आहे , त्यापूर्वी ४५ दिवस अगोदर संपूर्ण भाडेरक्कम, जी.एस.टी. तसेच अनामत रकमेचा भरणा करुन घेणेत येईल.

४) प्रदर्शनकर्त्यांनी जागेची बुकींग केल्यानंतर बुकींग रद्द करणेची झाल्यास प्रदर्शनाच्या तारखेपूर्वी ४५ दिवस अगोदर कळविणे आवश्यक आहे. असे केल्यास भरणा केलेल्या Advance Booking रकमेतील ५०% रक्कम जप्त करुन उर्वरीत ५०% रक्कम परत करुन बुकींग रद्द करता येईल.

५) जागेच्या उपलब्धतेनुसार प्रदर्शनाचे आयोजन जागा मागणी अर्जापासून ४५ दिवसांचे आत होत असेल, तर संपूर्ण भाडेरक्कम, जी.एस.टी. तसेच अनामत रकमेंचा भरणा करुन घेणेत येईल. व या परिस्थितीत बुकींग रद्द करणेची झाल्यास भरणा केलेली भाडेरक्कम व अनामत रक्कम संपूर्णपणे जप्त करणेत येईल.

६) रद्द केलेल्या बुकींगसाठी कार्यक्रमामधील बदल विचारात घेतले जाणार नाहीत किंवा त्याच बुकींगमध्ये पुढील तारखा देण्यात येणार नाही.

७) भाडेरकमेच्या २५% अनामत रक्कमेसह वीज शुल्कापोटी जागेच्या मागणी केलेल्या क्षेत्रानुसार खालीलप्रमाणे वीज बीलाची आगाऊ रक्कम भरणा करावी लागेल.

| PIECC जागेतील मागणी केलेले क्षेत्र (चौ.मी.) | वीज बीलाची आगाऊ रक्कम रु. |
|---|---|
| १०,००० चौ.मी. पर्यंत | २.५० लाख |
| १०,००० ते ३०,००० चौ.मी. | ५.०० लाख |
| ३०,००० चौ.मी. पेक्षा जास्त | १०.०० लाख |

८) मागणी केलेल्या जागेपेक्षा विनापरवानगी कोणत्याही प्रकारची जागा वापरल्यास प्रचलीत दराच्या दुप्पट दराने भाडेवसूली करणेत येईल.

९) खुल्या प्रदर्शन केंद्राच्या जागेमध्ये प्राधिकरणाने १०,००० चौ.मी. क्षेत्रावर कॉंक्रीटीकरण करुन प्लॅटफॉर्म तयार केला आहे. सदर कॉंक्रीटची तोडफोड अथवा जागेवरील इतर साधनांची तोडफोड केली आहे किंवा कसे? याबाबत या कार्यालयाच्या अभियांत्रिकी विभागामार्फत स्थळपाहणी करुन तपासणी करणेत येईल. सदर ठिकाणी तोडफोड झाली असल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी प्रत्यक्षात येणारा खर्च अभियांत्रिकी विभागामार्फत निश्चित करणेत येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहील. सदर तोडफोडीचा खर्च अनामत रकमेतून वसूल करणेत येईल.

उपरोक्त कार्यपद्धती दि. ०१/०१/२०२५ पासून लागू करण्यात येत आहे.

(डॉ. योगेश म्हसे, भा.प्र.से.)
महानगर आयुक्त,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख